महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

टोल फ्री क्र. १८०० २२२ ०१९
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४
Email ID:-directoriayruralhousing@gmail.com
Website:- https://mahaawaas.com

जा.क्र./कावि/अतिक्रमण/तक्रार अर्ज/ ८३६ /२०२३ दि: ३० .०६.२०२३

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ.

विषय:-ग्रा.पं. इसापुर धरण ता. पुसद जि. यवतमाळ येथील बेघर कुटूंबाना अतिक्रमण जागेवरील शेत स.नं. ५१ मधील घर बांधणे करीता जागा उपलब्ध करुण देणे बाबत.

संदर्भ:- ॲड निलय नाईक यांचे कडील पत्र दि.११.०४.२०२३ अन्वये.

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये ग्रा.पं. इसापुर धरण ता. पुसद जि. यवतमाळ येथील बेघर कुटूंबाना अतिक्रमण जागेवरील शेत स.नं. ५१ मधील घर बांधणे करीता जागा उपलब्ध करुण देणेची विनंती केली आहे. या संदर्भात नियमानुसार कार्यवाही करुन या बाबतचा अहवाल या कार्यलयास सादर करण्यात यावा, ही विनंती

M Takale
(मंजिरी टकले)
उपसंचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रत :- १) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहितीस्तव.
२) कक्ष अधिकारी (यो-१०), ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव.

E- 5677905

ग्रा.वि. व ज.स. वि. (नों.शा.)
कार्यासन क्र. ग्रा-१०
दिनांक : १६/२/२३
नस्ती क्र. 698

सं.क्र. VIP/०६ गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२

अ‍ॅड. श्री.निलय नाईक, मा. विधानपरिषद सदस्य, जिल्हा यवतमाळ यांचे दि.२६/१२/२०२२ रोजीचे पत्र मा.उप मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडून (ई-ऑफीस क्रमांक. ५५९४८१६ /दिनांक २७/१२/२०२२) रोजीच्या पत्राची प्रत सहप्रतिसह यासोबत पाठविण्यात येत आहे,कृपया अवलोकन व्हावे.

२. सदर पत्रातील विषयांचे अवलोकन केले असता , सदर विषय ग्राम विकास विभागाशी संबंधीत असल्याचे दिसून येते असल्याने सदर पत्र आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे.

कार्यासन अधिकारी (श्री.राजु अंबाडेकर)

कार्यासन अधिकारी (ग्राम विकास विभाग)

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - 55-29
आवक दिनांक - 05-04-2023
शाखा -

सहाय्यक संचालक (लेखा) उपसंचालक संचालक

१८८/शिकाना/गृ.वि.
२८.१२.२०२२

८२१३५
१२/१/२३

महाराष्ट्र विधानपरिषद

## ॲड. निलय नाईक

आमदार

महाराष्ट्र राज्य

जावक क्र.: ______

दिनांक : 26/12/22

प्रति,

मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस साहेब,

उपमुख्यमंत्री,

महाराष्ट्र राज्य, मुंबई ३२

मा. उप मुख्यमंत्री कार्यालय
ई-ऑफीस क्र. : 5594816
दिनांक 27/12/22

विषय : ग्रा.पं. इसापुर धरण ता. पुसद जि. यवतमाळ येथील बेघर कुटूंबाना अतिक्रम जागेवरील शेत स.नं. ५१ मधील घर बांधणे करीता जागा उपलब्ध करुन देणे बाबत.

महोदय,

आपणास सविनय विनंती पूर्वक कळविण्यात येते की, ईसापुर (ध) येथील बेघर व अतिक्रमण धारक ग्रामस्थ सन १९७२ मध्ये उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे काम सुरु होवून प्रत्यक्ष पाणी साठा १९८२ मध्ये काम प्रगती पथावर करण्यात आला. परंतु त्या काळात उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे काम प्रगती पथावर सुरु असतांना या विभागातील सर्व कर्मचारी राहण्याकरिता कर्मचाऱ्यांना तात्पुरते गाळे बांधकाम करण्यात आले होते. शेत स.नं. ५१ मधील ई वर्ग क्षेत्रफळ १८.६३ हे.आर. जमिन होती. परंतु या जमिनीवर गाळे बांधकाम करण्यात आले होते. परंतु १९८२ मध्ये धरण निर्मितीचे काम पूर्ण झाले. व त्यानंतर सदर कर्मचारी टप्याटप्याने सेवानिवृत्त झाले व काही स्थानांतरीत झाले. सदरचे गाळे पूर्णत: मोडकळीस व जिर्ण झाले आहे व काही गाळे पडले आहे. तरी देखील या गाळयामध्ये कसेबसे गोरगरीब मजुर व गरजु बेघर लाभार्थी जिवन जगत आहेत. सर्व १७५ ते २०० कुटूंब अतिक्रमण धारक असल्यामुळे व पंतप्रधान आवास योजनेच्या मुळ यादीत सर्वांचे नावे असून यांना कोणत्याही प्रकारची ग्रा.पं. मार्फत मुलभूत सुविधा मिळत नसल्यामुळे त्या जागेवरील अतिक्रमण जागा त्यांना दिल्यास त्यांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घर बांधकाम केल्यास त्याचे स्वप्न पूर्ण होईल. तरी मे. साहेबांनी आपण सदर प्रकरणी लक्ष देवून कायमस्वरुपी प्रश्न निकाल काढून गरजू व बेघर लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांना अतिक्रम नियमाकुल करुन सदर लाभ देण्यात यावा.

सबब माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव सादर.

धन्यवाद !

आपला,

(निलय नाईक)

DS(K)

अजिंक्य प्रेस, गांधी नगर, पुसद, ता. पुसद, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र
फोन नं.: ०७२३३-२४६७१०, मो.: ०९४२२१६५५२२, ई-मेल : nilaymnaik@gmail.com

# ग्रामपंचायत कार्यालय इसापूर (धरण) ता. पुसद . जि. यवतमाळ

## दिनांक:- १०/ १२/२०२२ रोजी झालेल्या ग्रामसभा बैठकीचे इतिवृत्त नोंदवही सन २०२२ – २०२३

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचाराकरीता आलेले विषय व ठराव | अनुकूल | प्रतिकूल | तटस्त | हजर पंचाच्या सह्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ठराव क्र. ७/६ | सूचक :- शेख मुशीर शेख खाजा<br><br>अनुमोदन :- भिमराव चिंतामण पाईकराव | आज दिनांक : १०/१२/२०२२ वार शनिवार रोजी ग्रामपंचायत कार्यालय इसापूर (धरण) ची विशेष / सर्वसाधारण ग्रामसभा सरपंच श्री/सौ. कैलासराव यशवंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालय इसापूर (धरण) या ठिकाणी सकाळी/दुपारी ठीक :१०-०० वाजता बोलविण्यात आली.या सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.<br>विषय:- १) इसापूर (धरण) ता पुसद जि.यवतमाळ येथील बेघर कुंटूबाना अतिक्रमण जागेवरील शे.स.नं ५१ मधील घर बांधकामाकरिता जागा उपलब्ध करून देण्या बाबत.<br>अध्यक्ष यांचे परवानगीने घेण्यात आलेला विषय.<br>आज ग्रामसभेत विषयात दर्शविल्याप्रमाणे ग्रा.प. इसापूर (धरण) येथील बेघर लाभार्थी यांनी असे सुचविले कि,इसापूर (धरण) चे काम १९७२ ला सुरु झाले प्रत्यक्ष १९८२ मध्ये काम प्रगतीपथावर असताना या विभागातील कर्मचार्यांना राहण्याकरिता गाळे बांधकाम करण्यात आले शे.स.नं.५१ मधील "इ" वर्ग क्षेत्रफळ १८.६३ हे.आर जमिनीवर बांधकाम करण्यात आले होते. पूर्ण काम झल्यानंतर सदर कर्मचारी टप्प्या टप्प्याने सेवानिवृत्त झाले व काही स्थलांतरित झाले.सदर गाळे जीर्ण होऊन काही गाळे पडले आहेत या गाळ्यामध्ये येथील बेघर कुटुंब राहत आहे. तेव्हा १७५ ते २०० कुटुंब अतिक्रमण धारक असल्यामुळे त्यांची नावे प्रधानमंत्री आवास योजना प्रपत्र "ड" च्या यादीत असून भविष्यात त्यांना घरकुल मंजूर झाल्यास त्यांना जागा नाही त्या अनुषंगाने आजची सभा विनंती करते कि त्यांना पट्टे देऊन कायमस्वरूपी नावाने करून देण्याची कृपा करावी असे या ग्रामसभेत सर्वानुमते ठरले.<br>करीता ठराव सर्मानुमते मंजूर .<br><br>सरपंच<br>सरपंच<br>ग्राम पंचायत इसापूर<br>ग्रा.प.इसापूर (धरण)<br><br>ग्रामविकास अधिकारी<br>सचिव<br>ग्रामपंचायत इसापूर (धरण)<br>ग्रा.पं.इसापूर (धरण) | | | | हजेरी रजिष्टर प्रोसेडिंग प्रमाणे |

ग्रामपंचायत कार्यालय इसापूर (धरण) जा.क्र. ___ दि. ___ ता. पुसद

महाराष्ट्र शासन

# गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

गाव :- ईसापुर (५४२९०१) तालुका :- पुसद जिल्हा :- यवतमाळ

ाट क्रमांक व उपविभाग ५१

ुधारणा पद्धती सरकार

शेताचे स्थानीक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | | खाते क्र. | भोगवटादाराचे नाव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फेरफार क्र | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ेत्राचे एकक | हे.आर.चौ.मी | १५४ | सरकार वनवीभाग | | | | (१) | कुळाचे नाव व खंड |
| | | | वि सरकार ईसापुर | | | | (१) | |
| अ) लागवड | योग्य क्षेत्र | | वन विभाग ईसापुर | ४०.४७.०० | | | (१) | इतर अधिकार |
| जेरायत | - | | | | | | | |
| ागायत | - | ७८४ | जि वर्ग ईसापुर | १.९८.०० | | | (१) | प्रलंबित फेरफार : नाही. |
| ्कुण | - | | | | | | | |
| ा.यो. क्षेत्र | | ७८५ | चराई ई वर्ग | १८.६३.०० | | | (१) | शेवटचा फेरफार क्रमांक : UUU व दिनांक : UUU |
| ) पोट क्षेत्र (लागवड अयोग्य) | | | | | | | | |
| र्ग (अ) | | | | | | | | |
| र्ग (ब) | ६१.०८.०० | | | | | | | |
| ्कुण | | | | | | | | |
| ो.ख.क्षेत्र | ६१.०८.०० | | | | | | | |
| कुण क्षेत्र (अ+ब) | ६१.०८.०० | | | | | | | |
| ाकारणी | ०.०० | | | | | | | |
| ुडी किंवा विशेष ाकारणी | | | | | | | | |

ुने फेरफार क्र : 

सीमा आणि भुमापन चिन्हे

या ७/१२ अभिलेखा मधील गा.न.नं. ७ (दि. २३/१२/२०२१:०६:३०:२५ PM रोजी) व गा.न.नं.१२ ( दि. ०७/०२/२०२२:११:०७:४० AM रोजी) डिजिटल स्वाक्षरीत केला असल्यामुळे त्यावर कोणत्याही सही-शिक्क्याची आवश्यकता नाही.



सुचना : सदर ७/१२ डिजिटल स्वाक्षरीत झाल्यानंतर गा.न.नं. १२ मध्ये पिकांची माहिती अद्यावत झाली आहे तथापि अद्याप याबाबतचा बदल या ७/१२ वर घेण्यात आलेला नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

[illegible]

# गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही)

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम १९७१ यातील नियम २९ ]

गाव :- ईसापुर (५४२९०१) तालुका :- पुसद जिल्हा :- यवतमाळ

गट क्रमांक व उपविभाग ५१

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मिश्र पिकाखालील क्षेत्र | | | | | | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र | | | | | | |
| | | | | | | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र | | | | | | | | | |
| वर्षे | हंगाम | खाते क्रमांक | | | | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | स्वरूप | क्षेत्र | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | |
| | | | | | | | हे.आर.चौ.मी | हे.आर.चौ.मी | | हे.आर.चौ.मी | हे.आर.चौ.मी | | हे.आर.चौ.मी | | |
| २०१९-२० | खरीप | | | | | | | | | | | संरक्षित वन | ४०.४७०० | | |
| | | | | | | | | | | | | चराई पड | १८.६३०० | | |
| | | | | | | | | | | | | गायरण पड | १.९८०० | | |
| २०२०[illegible] | खरीप | | | | | | | | | | | संरक्षित वन | ४०.४७०० | | |
| | | | | | | | | | | | | चराई पड | १८.६३०० | | |
| | | | | | | | | | | | | गायरण पड | १.९८०० | | |
| २०२१-२२ | संपूर्ण वर्ष | १५४ | | | | | | | | | | सरकारी वन | ४०.४७०० | | |
| | | ७८४ | | | | | | | | | | चराई पड | १.९८०० | | |
| | | ७८५ | | | | | | | | | | चराई पड | १८.६३०० | | |

टीप : *४ - मिश्रणाचा संकेत क्रमांक, *५ - जल सिंचित, *६ - अजल सिंचित

Dated Copy

या ७/१२ अभिलेखा मधील गा.न.नं. ७ (दि. २३/१२/२०२१:०६:३०:२५ PM रोजी) व गा.न.नं.१२ ( दि. ०७/०२/२०२२:११:०७:४० AM रोजी) डिजिटल स्वाक्षरीत केला असल्यामुळे त्यावर कोणत्याही सही-शिक्क्याची आवश्यकता नाही.



सुचना : सदर ७/१२ डिजिटल स्वाक्षरीत झाल्यानंतर गा.न.नं. १२ मध्ये पिकांची माहिती अद्यावत झाली आहे तथापि अद्याप याबाबतचा बदल या ७/१२ वर घेण्यात आलेला नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

७/१२ डाउनलोड दि. : [illegible] PM वैधता पडताळणीसाठी https://digitalsatbara.[illegible] या संकेत स्थळावर [illegible] हा क्रमांक

12/9/2022

वर्ष:2022-23

# गाव नमुना आठ-अ
## धारण जमिनींची नोंदवही (कृषिक)
## ( आसामीवार खतावणी -- जमाबंदी पत्रक )

गाव:ईसापुर | तालुका:पुसद | जिल्हा:यवतमाळ

| गाव नमुना सहा मधील नोंद | भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक | धारण क्षेत्र | | | वसुलीसाठी | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवडी योग्य क्षेत्र | पोटखराब क्षेत्र | एकूण क्षेत्र | आकारणी किंवा जुडी | दुमाला जमिनीवरील नुकसान | स्थानिक उपकर | | |
| | | (हे.आर.चौ.मी) | (हे.आर.चौ.मी) | (हे.आर.चौ.मी) | रु.पै. | रु.पै. | जि.प. रु.पै. | ग्रा.प. रु.पै. | रु.पै. |
| (१) | (२) | (३अ) | (३ब) | (३क) | (४) | (५) | (६अ) | (६ब) | (७) |
| खाते क्र.785 | चराई ई वर्ग . | | | | | | | | |
| सरकार | 51 | 18.63.00 | 0.0000 | 18.63.00 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | एकूण | 18.63.00 | 0.0000 | 18.63.00 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |


For View Only

टिप : उक्त रकाना क्र.(३अ) मधील लागवडी योग्य क्षेत्र हेच आकारणीस पात्र क्षेत्र राहील, पोट-खराब क्षेत्रावर आकारणी लागू नाही.

सुचना : या संकेतस्थळावर दर्शविलेली माहिती ही कोणत्याही शासकीय अथवा कायदेशीर बाबींसाठी वापरता येणार नाही

# Plot Report

Rural, District : यवतमाळ, Taluka : पुसद, Village : ईसापुर,




Survey No. : 51
Total Area : 40.4700
Pot kharaba : 0.0000
Owner Name : वि सरकार ईसापुर, सरकार वनवीभाग, वन विभाग ईसापुर
Khata No. : 154

--------------------------------

Survey No. : 51
Total Area : 1.9800
Pot kharaba : 0.0000
Owner Name : जि वर्ग ईसापुर
Khata No. : 784

--------------------------------

Survey No. : 51
Total Area : 18.6300
Pot kharaba : 0.0000
Owner Name : चराई ई वर्ग
Khata No. : 785

# तहसिलदार, पुसद यांचे कार्यालय,पुसद.

सिव्हील लाईन, यशवंत रंगमंदीराजवळ, पुसद ता.पुसद जि. यवतमाळ
दुरध्वनी क्रमांक 07233-246032 Email tahsildar.pusad@gmail.com

क्रमांक/म.सहा./प्रतु.1/कावि/ 1165 /2021 दिनांक : 25/10/2021

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
यवतमाळ (राजस्व विभाग)

विषय :- मौजा ईसापुर ता.पुसद येथील शेत स.नं. 51 मधील ई वर्ग जमिन गावठाणासाठी मिळणेबाबत.

संदर्भ :- मा.उपजिल्हाधिकारी,(महसूल)जि.का.यवतमाळ यांचे पत्र क्र./म.स./राजस्व-5/कावि/664 /2021 दि. 23/09/2021.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, मौजा ईसापुर ता.पुसद येथील शेत स.नं. 51 मधील ई वर्ग जमिन गावठाणासाठी मिळणेबाबत श्री भास्कर चोखा थोरात, सरपंच ग्रा.पं. ईसापुर (ध.) यांचे अर्जावर नियमानुसार ,तात्काळ कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यवतमाळ संदर्भ क्र.(C.R.) 979 अनुषंगाने संदर्भीय पत्राव्दारे सुचीत केले आहे.

त्याअनुषंगाने या कार्यालयाचे नायब तहसिलदार, (महसूल) पुसद यांचेमार्फत स्थळनिरीक्षण करुन अहवाल सादर करणेबाबत सुचीत करण्यात आले.

त्यानुसार नायब तहसिलदार, महसूल, मंडळ अधिकारी, शेंबाळपिंपी व तलाठी ईसापुर यांनी संयुक्त अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. त्यांचे अहवालमध्ये खालील मुद्दे स्पष्ट होतात.

1) मौजा ईसापुर ध. ता. पुसद येथील स.नं. 51 क्षेत्र 61.00 हे.आर या शेतजमिनीपैकी 40.47 हे.आर जमिन सरकार वन विभाग वि. सरकार वनविभाग ईसापुर यांचे नावाने सातबारावर दर्शविते तसेच जी वर्ग ईसापुर यांचे नावाने 1.98 हे.आर व चराई ई वर्ग-18.63 हे.आर दर्शविते. सदर स.नं. 51 हा सध्या जलसंपदा विभाग यांचे ताब्यात असल्याचे दिसुन येते. सदर स.नं. 51 मध्ये जलसंपदा विभागाचे विश्रामगृह कार्यालय, वसाहत, जि.प.शाळा ईत्यादी मोक्यावर दिसुन येते.
2) स्थानिक चौकाशी केली असता स.नं. 51 मधील वसाहतीमध्ये गावातील खाजगी 74 कुटुंबे व इतर विविध विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची 51 कुटुंबे असे एकुण-125 कुटुंब अतिक्रमण करुन वसाहतीमध्ये रहात आहेत.
3) येथील नागरिकांची जागेची मागणी असुन या करीता ग्रामपंचायतीच्या वतीने गावठाणाकरीता जमिनीची मागणी केली आहे.
4) सदर वसाहती खालील एकुण क्षेत्र अं.20.00 हे.आर आहे. ईसापुर गावातील पुनवर्सनासाठी स.नं. 17 मधील जागेची मागणी केलेली आहे. तसेच स.नं. 51 मधील जमिन ग्रामपंचायत वाढीव गावठाणासाठी मागणी करीत आहेत.
5) ईसापुर ग्रामपचांयतीने स.नं. 51 मधील जागा वाढीव गावठाणासाठी सुध्दा मागणी केली आहे. परंतु, स.नं. 51 हा जलसंपदा विभागाच्या ताव्यात दिसुन येतो. परंतु, 7/12 मध्ये जलसंपदा विभागाच्या नावे दुरुस्ती झालेली नाही. तसेच सदर स.नं. ची भुमि अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन जी वर्ग, चराई ई वर्ग, सरकार वनविभाग इसापुर यांचे क्षेत्राचे सिमांकन निश्चीत करणे आवश्यक आहे, असा अहवाल सादर केला आहे.

करीता मुद्देनिहाय अहवाल सविनय सादर.

आपला विश्वासु,

(राजेश चव्हाण)
तहसिलदार,पुसद

1057

महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग
उपविभागीय अभियंता
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प व्यवस्थापन उपविभाग क्र.1 पेनगंगानगर 445206
ता.पुसद जि.यवतमाळ.

जा.क्र.उपेप्रउवि1/तांशा/ 692/व.प्र.                                                                 दि. 27/OCT 2021

प्रति,
मा.कार्यकारी अभियंता,
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.1
नांदेड.

**विषय :- उर्ध्व पेनगंगा प्रकल्प येथील वसाहती वरील रिकाम्या जागेवर होत असलेले अतिक्रमण हटवून ग्रामपंचायत ईसापुर ला हस्तांतरित करणे बाबत.**

संदर्भ :- विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र.उ.प्र.प्र.वि-1/तांशा-4/2381 दि.04/08/2021

वरिल विषयानुसार सादर करण्यात येते कि, संदर्भीय पत्रान्वये विषयांकित प्रकरणी स्वंयस्पष्ट अहवाल मागविण्यात आला होता त्याअनुषंगाने पेनगंगानगर नगर वसाहतीची स्थळ पाहणी दि.07/10/2021 रोजी करण्यात आलि असुन त्याबाबत चा स्थळ पाहणी अहवाल सोबत सादर करण्यात येत आहे.

या कार्यालयाकडे अत्यल्प कर्मचारी असुन उपलब्ध कर्मचा-याकडुन पुरनियंत्रण करणे, डावा व उजवा कालव्यांचे सिंचनासाठी द्वार परिचलन करणे अत्यंत कठिण आहे. त्यामुळे वसाहती मध्ये नियंत्रणासाठी या कार्यालयाकडे कोणताही कर्मचारी उपलब्ध नाही.

तसेच या उपविभागा अंतर्गत भविष्यात कोणताही नविन प्रकल्प प्रस्तावित नाही या सर्व बाबींचा विचार करुन सदर वसाहतीमधील कर्मचारी राहत असलेल्या गाळया व्यतिरिक्त ईतर गाळयांची भविष्यात निवासी प्रयोजनासाठी गरज भासणार नाही. त्यामुळे जलसंपदा विभागाच्या प्रचलित नियमानुसार सदर वसाहती मधील उदध्वस्त झालेल्या गाळयांची जागा, मोकळी जागा व अनधिकृत पणे राहत असलेल्या सेवानिवृत्त कर्मचारी व खाजगी व्यक्ती च्या गाळयांची जागा ईसापुर ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यास या कार्यालयाची हारकत नाही.

करिता पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

उपविभागीय अभियंता
उर्ध्व पेनगंगा प्रकल्प व्यवस्थापन
उपविभाग क्र.1 पेनगंगानगर.

सोबत:- 1. स्थळ पाहणी अहवाल-3प्रती
2. वसाहत नकाशा- 3प्रती

प्रत :- शाखाधिकारी,इसापुर धरण शाखा पेनगंगानगर यांना माहितीस्तव रवाना.

# स्थळ पाहणी अहवाल

**विषय :- उर्ध्व पेनगंगा प्रकल्प येथील वसाहती वरील रिकाम्या जागेवर होत असलेले अतिक्रमण हटवुन ग्रामपंचायत ईसापुर ला हस्तांतरित करणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने आज दि.07/10/2021 रोजी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प पेनगंगानगर येथील वसाहतीची पाहणी केली असता खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

1. श्री. एच एस धुळगंडे – उपविभागीय अभियंता
2. श्री. एस.एम.सुर्यवंशी – कनिष्ट अभियंता
3. श्री. आर.एस.जामकर – माळी

इसापुर धरण परिसरामधील पेनगंगानगर वसाहतीचे क्षेत्रफळ 19.85 हे. असुन त्यामध्ये बी प्रकार,सी प्रकार. डी प्रकार व ई प्रकार चे निवासी गाळे सन 1975 मध्ये कर्मचा-यासांठी बांधण्यात आले होते. धरणाच्या पाया भरणी वेळेस सर्व गाळे सुस्थितीत होते. सदर गाळे हे 46 वर्ष जुनी झाली त्यामधील डी-प्रकार व ई-प्रकारचे गाळे पुर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत.

तसेच बी-प्रकार व सी-प्रकार च्या गाळ्यामध्ये या उपविभागा अंतर्गत कार्यरत असलेले केवळ 8 कर्मचारी राहतात. उर्वरीत 144 गाळयामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी, अनाधिकृत खासगी नगरिकांनी अतिक्रमण केलेले आहे यावाबतचा उल्लेख वसाहतीच्या नकाश्यावर करण्यात आला असुन सोबत सादर करण्यात येत आहे. या बाबतीत संबधीतांना या कार्यालयामार्फत नोटिस देण्यात आल्या आहेत व त्याबाबतची यादी विभागीय कार्यालयास सादर करण्यात आली आहे.

वसाहतीमधील सर्व गाळे हे 46 वर्ष जुनी असल्यामुळे सद्यस्थितीत रहाण्यायोग्य नाहीत.वसाहतीमधील मोकळ्या जागेवर खाजगी नागरिकांनी अतिक्रमण करुन वहिती करत आहेत.

या कार्यालयाकडे अत्यल्प कर्मचारी असुन उपलब्ध कर्मचा-याकडुन पुरनियंत्रण करणे, डावा व उजवा कालव्यांचे सिंचनासाठी द्वार परिचलन करणे अत्यंत कठिण आहे. त्यामुळे वसाहती मध्ये नियंत्रणासाठी या कार्यालयाकडे कोणताही कर्मचारी उपलब्ध नाही.तसेच या उपविभागा अंतर्गत भविष्यात् कोणताही नविन प्रकल्प प्रस्तावित नाही. या सर्व बाबींचा विचार करुन सदर वसाहतीमधील कर्मचारी राहत असलेल्या गाळ्या व्यतिरिक्त ईतर गाळ्यांची भविष्यात निवासी प्रयोजनासाठी गरज भासणार नाही. त्यामुळे जलसंपदा विभागाच्या प्रचलित नियमानुसार सदर वसाहती मधील उदध्वस्त झालेल्या गाळ्यांची जागा. मोकळी जागा व अनिधिकृत पणे राहत असलेल्या सेवानिवृत्त कर्मचारी व खाजगी व्यक्ती च्या गाळ्यांची जागा ईसापुर ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यास या कार्यालयाची हारकत नाही.

एस.एम.सुर्यवंशी
कनिष्ट अभियंता

एच.एस.धुळगंडे
उपविभागीय अभियंता
उ.पै.प्र. उपविभाग क्र.१
पेनगंगानगर

ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत पात्र परंतु
भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन
देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२१/प्र.क्र.८१/योजना-१०

बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
तारीख: २२ ऑगस्ट, २०२२

<u>वाचा</u> :-

१) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/योजना-१०, दि.१४.०७.२०१७

२) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक : प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दि. १६.०२.२०१८

३) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: पीडीयु-२०१८/प्र.क्र.२५७/योजना-१०, दि.०२.०८.२०१८

<u>प्रस्तावना</u> :-

**"सर्वांसाठी घरे - २०२४"** हे राज्य शासनाचे धोरण असून, त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना **"सन २०२४" पर्यंत** स्वत:चे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न आहे. त्यानुसार राज्यात ग्रामीण भागातील बेघरांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व अटल बांधकाम कामगार आवास योजना इत्यादी विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांतर्गत ज्या लाभार्थ्यांकडे स्वत:ची जागा आहे, अशा लाभार्थ्यांना २६९ चौ. फूट चटई क्षेत्र घरकुल बांधकामासाठी, सर्वसाधारण क्षेत्रात रु.१.२० लक्ष व नक्षलग्रस्त डोंगराळ क्षेत्रात रु. १.३० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात येते.

२. राज्य शासनाने संदर्भाधीन दि. १४ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत घरकुलास पात्र, परंतु भूमीहीन लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याकरिता पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना राबविण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना ५०० चौ. फूट पर्यंत जागा खरेदी करण्यासाठी रु. ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते.

३. राज्य शासनाने संदर्भाधीन दि.१६/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचे दि.०१/०१/२०११ पूर्वीचे निवासी जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ग्रामीण गृहनिर्माण योजनाअंतर्गत ज्या लाभार्थ्यांचे अतिक्रमण दि. ०१/०१/२०११ पूर्वीचे आहे, अशा लाभार्थ्यांचे निवासी अतिक्रमण नियमानुकूल करुन देवून लाभार्थ्यांना संबंधित योजनांतर्गत लाभ देण्यात येतो.

४. राज्य शासनाने संदर्भाधीन दि.२ ऑगस्ट, २०१८ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी व शासनाच्या इतर विभागांकडून उपलब्ध झालेल्या शासकीय / संपादित जागा आणि ग्राम पंचायत अंतर्गत गावठाणात येणारी जागा विनामूल्य उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.

५. राज्यात भूमिहीन लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करणे, विनामूल्य शासकीय जमिनी उपलब्ध करणे व इतर माध्यमांतून जागा उपलब्ध करुन देण्यात येते. राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत १११८५६ एवढे भूमिहिन पात्र लाभार्थी आहेत. त्यापैकी आतापर्यंत ५८३२१ एवढया भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात आली असुन ५३५३५ एवढे भूमिहीन लाभार्थी शिल्लक आहेत.

६. राज्यात पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजना व ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करताना खालील अडचणी येत आहेत :-

अ) जागा उपलब्ध नसणे :-

राज्यात ग्रामीण भागामध्ये गावठाण क्षेत्रात सद्यस्थितीत जागा उपलब्ध नाहीत. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीमध्ये अकृषक जागा देखिल उपलब्ध नाहीत. त्यामुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पात्र, परंतु भूमीहीन लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात लाभ देणे शक्य होत नाही.

ब) तुकडेबंदी कायद्याअंतर्गत तरतूद :-

राज्य शासनाच्या तुकडेबंदी कायद्यामुळे गावठाणाबाहेरील कृषक जमीन खरेदी करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. या कायद्याअंतर्गत ५०० चौ. फूट जमीन खरेदी करता येत नाही. त्यामुळे

पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना गावठाणा बाहेरील जमीनी उपलब्ध होत नाहीत.

**क) जागेची किंमत :-**

राज्यातील ग्रामीण भागामधील ग्रामपंचायत क्षेत्रातील जागेच्या किंमती जास्त आहेत. पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्रती लाभार्थी रु. ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य अनुदान अनुज्ञेय आहे. एवढया कमी अर्थसहाय्यामध्ये ग्रामीण भागामध्ये जागा उपलब्ध होत नाहीत. त्याचप्रमाणे या योजनेअंतर्गत अनुज्ञेय अर्थसहाय्यामध्ये मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क व मोजणी शुल्क इ. शासकीय शुल्कांचा समावेश आहे. त्यामुळे जागा खरेदी करण्यास उपलब्ध होणारी अर्थसहाय्याची रक्कम फारच कमी आहे.

**ड) गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करताना आवश्यक दुप्पट जमिन उपलब्ध नसणे :-**

राज्यातील सार्वजनिक वापरातील जमिनी/गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबत व अतिक्रमणे निष्काषित करण्याबाबतचे धोरण महसूल व वन विभागाच्या दि.१२/०७/२०११ च्या शासन निर्णयान्वये घोषित केले आहे. राज्य शासनाने संदर्भाधिन दि.१६/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचे दि.०१/०१/२०११ पुर्वीचे निवासी जागेवरील अतिक्रमण नियमानुकुल करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नियमानुकूल करण्याच्या योजनेतील महसुल विभागाच्या अखत्यारीतील गायरान जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करताना अतिक्रमीत जागेच्या दुप्पट जागा ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापी, राज्यात सद्यस्थितीत अशा जागा राज्यातील ग्रामपंचायतींकडे उपलब्ध नाहीत, त्यामुळे अशा भूमिहीन लाभार्थ्यांना या योजनेतंर्गत लाभ देणे शक्य होत नाही.

**इ) राज्यातील महसुल विभागा व्यतिरिक्त इतर विभागाच्या जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना नसणे :-**

महसुल विभागा व्यतिरिक्त इतर शासकीय विभागांच्या जागांचे अतिक्रमणे नियमित करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना नाहीत व जिल्हास्तरीय संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देखील ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार नाहीत. म्हणुन अशा लाभार्थ्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास अडचणी येत आहेत.

**ई) राज्यातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करताना मागासवर्गीय लाभार्थ्यांना शुल्क आकारणे :-**

राज्य शासनाने ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करण्याच्या धोरणात दि.१६/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा केली आहे. त्यानुसार अतिक्रमणाच्या वेगवेगळया प्रकरणी निवासी प्रयोजनार्थ नियमानुकूल करण्याचे शुल्क, प्रचलित वार्षिक मुल्य, दर तक्त्यानुसार येणाऱ्या शुल्काच्या गुणन पदानुसार (Multiplication Factor) आकारुन ही अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण नियमानुकूल करताना शुल्क आकारण्यात येत असल्यामुळे मागासवर्गीय लाभार्थ्यांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्यास अडचणी येत आहेत.

**उ) राज्यातील ग्रामीण घरकूल योजनांतर्गत लाभार्थ्यांच्या घराच्या बांधकामासाठी वाळू उपलब्ध होण्यासाठी अडचणी :-**

राज्य शासनाने दि. ०३/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये वाळू/ रेती निर्गती संदर्भात धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेच्या लेखी मागणीनुसार या योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या घरांच्या बांधकामासाठी योग्य त्या आकारमानाचे वाळूगट राखीव ठेवण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महसूल व वन विभागाच्या दि.१७/११/२०१८ च्या अधिसुचनेव्दारे जिल्हयातील वाळू उत्खननाकरिता पर्यावरण अनुमती घेऊन लिलावासाठी निश्चित केलेल्या मात्र यशस्वीरित्या बोली न लागलेल्या वाळू घाटांपैकी अथवा या कारणास्तव जिल्हाधिकाऱ्यांकडुन विशेषत: राखीव ठेवण्यात आलेल्या वाळु घाटापैकी या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या वाळुघाटातुन कोणतीही फी किंवा स्वामित्वधन न आकारता अशा गृहनिर्माण योजनेंतर्गत स्वत:च्या घराच्या बांधकामासाठी पाच ब्रासपेक्षा अधिक नाही एवढी वाळू काढण्याची तरतुद करण्यात आली आहे.

या संदर्भात असे निदर्शनास आले आहे की, राज्य शासनाने वरीलप्रमाणे तरतूद करून सुध्दा ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत लाभार्थ्यांना वाळु उपलब्ध करुन देण्याकरिता अडचणी येत आहेत.

७. राज्यातील भुमिहीन बेघर पात्र लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यास अडचणी येत असल्यामुळे या पात्र लाभार्थ्यांना जमिन उपलब्ध करुन देण्यासाठी सवलती देण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व अन्य ग्रामीण घरकुल योजनांमधील पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाचा लाभ मिळण्यापासून वंचित आहेत व या भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देताना विविध अडचणी येत आहेत. या अडचणी विचारात घेऊन भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी खालील प्रस्तावास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतील लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत जागा खरेदी करताना प्रधानमंत्री आवास योजना - शहरीच्या धर्तीवर मुद्रांक शुल्काची रक्कम रु.१०००/- इतकी आकारणे.

२) प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व इतर राज्यपुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोजणी शुल्कामध्ये अनुज्ञेय ५० % सवलत एकुण भुखंडाकरीता लागू न करता त्यांनी खरेदी केलेल्या जागेकरिताच लागू करणे.

३) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांमधील लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ५०० चौ. फुट कृषक जमिन खरेदी करतांना तुकडेबंदी कायद्यातील अट लागू होणार नाही अशी संबंधित अधिनियमात सुधारणा करणे.

४) पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दोन मजली (G+2) ऐवजी चार मजली (G+4) इमारत बांधण्यास मान्यता देणे.

५) ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांनी निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण केलेल्या गायरान जागा, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्य शासन पुरस्कृत आवास योजना या सार्वजनिक प्रयोजन असल्याने, त्या गायरान जागा सार्वजनिक प्राधिकरण- **"ग्रामपंचायत"** यांना वर्ग करणे व ग्रामपंचायतीने निवासी कारणासाठी सदर गायरान जागा अभिन्यास मंजूर करुन घेवून त्याच लाभार्थ्यांना भाडेपट्टयाने देण्याची कार्यपध्दती ग्रामविकास विभागाने निश्चित करण्यास मान्यता देणे. यासाठी आवश्यकता असल्यास संबंधित अधिनियमात तरतूद करणे.

६) ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांनी महसुल विभागाव्यतिरिक्त इतर प्रशासकीय विभागांच्या जमिनीवर केलेले अतिक्रमण जसे- जलसंपदा विभाग, शेती महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी, नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी संबंधित प्रशासकीय विभागाच्या मंत्रालयीन सचिवांकडे मान्यतेसाठी सादर करणे, संबंधित प्रशासकीय विभागाच्या मंत्रालयीन सचिवाने सदर प्रस्तावास, प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत मान्यता देणे, तसे

न केल्यास या प्रस्तावांना संबंधित प्रशासकीय विभागाची मान्यता आहे असे समजणे, संबंधित प्रशासकीय विभागाने अतिक्रमण नियमानुकूल करण्याचा प्रस्ताव नामंजूर केल्यास असे प्रस्ताव पुनर्विचारार्थ मुख्य सचिव यांचेकडे सादर करणे, या कार्यवाहीस अधिन राहून जिल्हाधिकारी यांना महसूल विभागाव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय विभागाच्या जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणे.

७) ग्राम विकास विभागाच्या अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या योजनेअंतर्गत शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांनी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करताना महसूल विभागाच्या दि. ४ एप्रिल, २००२ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे मागासवर्गीय लाभार्थ्यांना विनामूल्य नियमानुकूल करून देण्यास मान्यता देणे.

सदर शासन निर्णय, दिनांक २७.०७.२०२२ रोजी मा.मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०८२२११३३४६७७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

RAJESH KUMAR

(राजेश कुमार)

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा राज्यपाल यांचे सचिव.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. सर्व विधानसभा व विधानपरिषद सदस्य.

६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
८. महालेखापाल (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व) मंत्रालय , मुंबई
१४. सर्व विभागीय आयुक्त.
१५. सर्व जिल्हाधिकारी.
१६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्योती अभियान, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१८. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१९. संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०. आयुक्त आदिवासी विकास, नाशिक.
२१. ग्राम विकास विभागातील सर्व सह / उप सचिव / अवर सचिव/ कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२२. उप सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. उप सचिव, नियोजन (का. १४११ व १४१४) व वित्त विभाग (का. व्यय- १५ व अर्थ- १७), मंत्रालय, मुंबई.
२४. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
२५. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती.
२६. अतिरिक्त संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
२७. निवड नस्ती (कार्यासन योजना-१०), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.